महिलेच्या पोटातून चक्क काढलं तब्बल १ किलो ६७० ग्रॅमचा दगड, दुर्मिळ शस्त्रक्रिया गोंदियात झाली यशस्वी
>> पान 2

महिला आणि युवांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणारा अर्थसंकल्प : केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे
>> पान 3

कॅन्सरसह ३६ औषधांवरील सीमा शुल्क केंद्र सरकारने माफ केल्याने औषधी होणार स्वस्त : केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव
>> पान 4

**सुविचार**

विचारपूर्वक केलेली कृती नेहमी फळ देणारी असते.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



मराठमोळ्या संस्कृतीची आंतरराष्ट्रीय झेप, सिनेमाची होतेय साता समुद्रापार चर्चा..!
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 172 ■ रविवार, दि. 02 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# करमुक्त उत्पन्न मर्यादा १२ लाखांवर

## शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा, क्रेडिट कार्ड लिमिट ३ लाखांहून ५ लाखांवर; १.७ कोटी शेतकऱ्यांना फायदा

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज आपला ८ वा अर्थसंकल्प सादर केला आहे. यादरम्यान त्यांनी प्रधानमंत्री धनधान्य योजनेची घोषणा केली आहे. या योजनेअंतर्गत १०० जिल्ह्यांचा समावेश करण्यात येईल, जिथे उत्पादन कमी आहे. राज्यांसह पंतप्रधान धनधान्य योजना चालवली जाणार आहे. यामुळे १.७ कोटी शेतकऱ्यांना फायदा होईल असा विश्वास निर्मल सीतारमण यांनी व्यक्त केला आहे. ग्रामीण भागांच्या विकासासाठी राज्यांसह धोरण तयार करणार असेही त्यांनी सांगितले आहे. यासह क्रेडिट लिमिट ३ लाखांवरुन ५ लाख करत शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट देण्यात आले आहे.

डाळींमध्ये स्वयंपूर्णतेसाठी धोरण जाहीर

तूर, उडीद आणि मसूरसाठी ६ वर्षांचे विशेष अभियान. केंद्रीय संस्था ४ वर्षांत तूर, उडीद आणि मसूर खरेदी करतील. बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापन केले जाईल, भाज्या, फळांचे उत्पादन वाढवण्यासाठी राज्यांसोबत योजना आखली जाईल असेही त्यांनी सांगितले आहे.

बिहारमध्ये मखाना बोर्डाचा प्रस्ताव

बिहारमध्ये मखाना बोर्ड प्रस्तावित आहे. मखानाच्या मार्केटिंगसाठी एक बोर्ड स्थापन केला जाईल. हे मखाना शेतकऱ्यांच्या हितासाठी केले जाईल. त्यांना सर्व सरकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठीही प्रयत्न केले जातील.

## नव्या करप्रणालीमुळे मध्यम वर्गीयांचे पैसे कसे वाचणार?

नवी दिल्ली : केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारमण यांनी मध्यमवर्गीयांसाठी मोठी घोषणा केली आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा त्यांनी आज केली. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात होती. दरम्यान, यंदाच्या अर्थसंकल्पात १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. परंतु, अर्थमंत्र्यांनी थेट १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा केली आहे.

वेगळं भांडवली उत्पन्न नसणाऱ्या करदात्यांना १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असेल. नव्या पद्धतीनुसार कर भरणा करणाऱ्या करदात्याचं उत्पन्न १२ लाख रुपये असेल, तर त्याला नव्या बदलांमुळे ८० हजार रुपयांचा कर कमी भरावा लागेल. याचा अर्थ, त्याचा १०० टक्के कर माफ होईल. एखाद्या करदात्याचं उत्पन्न १८ लाख असेल, तर त्याला नव्या बदलांमुळे ७० हजारांचा कर कमी भरावा लागेल. याचा अर्थ त्याचा ३० टक्के कर कमी होईल. २५ लाख उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीचा १ लाख १० हजारांचा कर कमी होईल, अर्थात त्याला २५ टक्के कर कमी भरावा लागेल.

## स्टार्टपअ्स आणि एमएसएमई ला बजेटमधून काय मिळाले?

नवी दिल्ली : केंद्र सरकार स्टार्टअप इकोसिस्टमला खूप पाठिंबा देत आहे. म्हणूनच यावेळीही अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी काहीतरी खास असेल अशी अपेक्षा होती. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज आपला आठवा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला असून स्टार्टअप संस्थापकांच्या काही अपेक्षा मोठ्या प्रमाणात पूर्ण केल्या आहेत, परंतु काही अपेक्षा अजूनही पूर्ण झालेल्या नाहीत. या वर्षीच्या अर्थसंकल्पात स्टार्टअप इकोसिस्टमला काय मिळाले ते जाणूंन घ्या छोट्या कंपन्या आणि स्टार्टअप्ससाठी एक विशेष क्रेडिट कार्ड जारी केले जाईल, ज्याची मर्यादा ५ लाख रुपये असेल. पहिल्या वर्षी १० लाख क्रेडिट कार्ड जारी केले जातील अशी माहिती निर्मला सीतारमण यांनी दिली आहे. एमएसएमसीची गुंतवणूक मर्यादा २.५ पटीने वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. स्टार्टअप्ससाठी क्रेडिट गॅरंटी कव्हर २० कोटी रुपये असेल असंही त्यांनी सांगितलं आहे. तसंच खेळण्यांच्या क्षेत्रासाठी एक जागतिक केंद्र निर्माण केले जाईल. कामगार केंद्रित क्षेत्रांसाठी प्रोत्साहन योजना सुरू केली जाईल. फुटवेअर लेदरसाठी एक विशेष योजना आणली जाईल. पहिल्यांदाच उद्योजकता करणाऱ्या अनुसूचित जातीच्या महिलांना ५ वर्षासाठी २ कोटी रुपयांचे मुदत कर्ज दिले जाईल असेही त्यांनी जाहीर केले आहे.



नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्माला सीतारामन यांनी (१ फेब्रुवारी) २०२५-२६ साठी अर्थसंकल्प सादर केला. निर्मला सीतारामन यांनी शेतकऱ्यांसाठी धनधान्य योजना आणणार असल्याचं जाहीर केलं. तसंच आमचा फोकस ऋधअछ वर असल्याचं त्यांनी नमूद केलं. निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले की, आमचे लक्ष 'ग्यान'वर आहे. GYAN म्हणजे G - गरीब, Y- तरुण, A- अन्नदाता आणि N - नारी शक्ती. अर्थमंत्री म्हणाल्या की, आम्ही गेल्या १० वर्षात बहुआयामी विकास केला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या भाषणात सरकारचा भर सर्वांसाठी विकासावर असल्याचे सांगितले. मध्यमवर्गीयांचा लाभ वाढवण्यावर भर दिला जात आहे. जियोपॉलिटिकल तणावामुळे जागतिक वाढ घसरली आहे.

## निर्मला सीतारामन यांची मोठी घोषणा

अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य योजना जाहीर केली आहे. सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे.यामुळे १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. सीतारामन म्हणाल्या की, गरीब, तरुण, महिला आणि शेतकरी यांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल.

शेतीची वाढ, ग्रामीण विकास आणि उत्पादनावर लक्ष केंद्रित केले आहे. आर्थिक क्षेत्रातील सुधारणांकडेही लक्ष देणार आहे. १०० जिल्ह्यांमध्ये धनधान्य योजना सुरू करण्यात येत आहे. तसेच किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख रुपये झाली आहे.

सरकार अनेक योजनांत बदल करणार का?

केंद्र सरकार यावेळी महिला व बालविकास, शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, आरोग्य आदी क्षेत्रांच्या विकासासाठी भरीव तरतूद करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच शेती आणि महिलांच्या विकासासाठी अनेक योजनांत केला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोबतच सरकार काही नव्या योजनांची घोषणा करणार का? हेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अर्थसंकल्पात महिलांना काय मिळाले?

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज(१ फेब्रुवारी) अर्थसंकल्प मांडत आहेत.संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेला केंद्रीय अर्थसंकल्प आज संसदेत सादर केला जात आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात अर्थसंकल्प वाचनाला सुरुवात केली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सामान्य जनता, नोकरदार, शेती, शिक्षण, रेल्वे, आरोग्य आणि टॅक्स स्लॅबसंदर्भात महत्त्वाच्या घोषणा केल्या जाणार आहेत. महिला शेतकऱ्यांकडे सरकारचं विशेष लक्ष असणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी, सर्वसमावेशक विकास, लोकांच्या भावना आणि मध्यमवर्गीयांच्या आकांक्षांना न्याय देण्याच्यादृष्टीने यंदाचा अर्थसंकल्प तयार करण्यात आल्याचे निर्मला सीतारामन यांनी सांगितले.

**महिलांसाठी करण्यात आलेल्या महत्वाच्या घोषणा**

-दोन कोटी रुपयांचा मध्यम मुदतीचे कर्ज नव्याने लघुउद्योजक महिलांना देण्यात येणार आहे.

-महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणार

- मागास वर्गातील महिलांसाठी नवी योजना, चामड्यांची पादत्राणे बनवणाऱ्यांसाठी ही योजना असून पाच लाख महिलांना योजनेचा लाभ होणार

- महिलांना स्टार्टअप साठी दोन कोटी रुपयांची मदत

- इंडिया पोस्ट महिला बँकेचे पुनरुज्जीवन करणार

- सक्षम अंगणवाडी आणि पोषण योजना- आठ कोटीहून अधिक लहान मुलांना पोषणमूल्य मिळणार

- स्टार्टअप्ससाठी १०,०००कोटींची तरतूद

: एससीएसटी महिलांना स्टार्टअप्ससाठी कर्ज स्वरूपात मदत

-- देशभरातील एक कोटी गर्भवती आणि स्तनदा मातांना, एक लाख किशोरवयीन मुलींना पोषणमूल्य वाढवणार (आकांक्षीत जिल्हे- ) ईशान्य भारतातही विशेष लक्ष

पोषण मुल्य पुरवण्यासाठी अतिरिक्त निधीची तरतूद

सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० कार्यक्रमंतर्गत ८ कोटी लहान मुलांना सकस अन्न पुरवणार.

## 'भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड ठरणारा अर्थसंकल्प'

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पाचे केले कौतुक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले. मध्यम वर्गाने या निर्णयाचे स्वागत केले असताना आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे.



ते म्हणाले, ''देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. त्यांनी मध्यम वर्गासाठी एक स्वप्नवत असा अर्थसंकल्प मांडला आहे. अपेक्षेपेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न केला आहे. १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. सात लाखांची असलेली मर्यादा थेट १२ लाखांपर्यंत नेण्यात आली आहे. त्यामुळे आता १२ लाख उत्पन्न असलेल्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. याचा मोठा फायदा मध्यम वर्गीय, नोकरदार आणि तरुणांना होणार आहे. यामुळे मोठे उत्पन्न मध्यमवर्गीच्या खिशात येणार आहे. हे उत्पन्न खर्च करताना देशातील मागणी वाढेल. ज्याचा थेट फायदा सूक्ष्म, लघू आणि मध्यम उत्पादनांना होईल. यातून रोजगार निर्मितीही होईल.''

या अर्थसंकल्पात धीराने आणि धाडसाने घेतलेला निर्णय भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड ठरेल, असे माझे मत आहे. यासोबत शेती क्षेत्रासाठी १०० जिल्ह्यांमध्ये ठरवून शेती क्षेत्राचा विकास करण्याची योजना आणली जाणार आहे. तसेच तेलबियांचे उत्पादन झाल्यानंतर केंद्र सरकार १०० टक्के खरेदी हमीभावाने करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना निश्चितच अधिक उत्पादन मिळणार आहे. मच्छिमारांनाही क्रेडीट मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत बिनव्याजी वाढविण्यात आली आहे.

## विकसित भारताला बळ देणारा अर्थसंकल्प - पंतप्रधान नरेंद्र मोदी

नवी दिल्ली : यंदाच्या अर्थसंकल्पात १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित झाल्या आहेत. युवकांसाठी विविध क्षेत्रांची दारे खुली झाली आहेत आणि विकसित भारत हे अभियान आता सामान्य नागरिक पुढे नेतील. हा अर्थसंकल्प देशाचे सामर्थ्य कित्येक पटींनी वाढवणारा आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

सामान्यतः सरकारची तिजोरी कशी भरता येईल यावर अर्थसंकल्पात भर दिला जातो; मात्र या अर्थसंकल्पात लोकांचे खिसे कसे भरता येतील, त्यांची बचत कशी वाढेल आणि त्यांना देशाच्या विकासात कसे सहभागी करुन घेता येईल यावर भर देण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प या उद्दीष्टांची पायाभरणी करणारा आहे. अर्थसंकल्प देशाचे सामर्थ्य कित्येक पटींनी वाढवणारा आहे. बचत, गुंतवणूक, क्रयशक्ती आणि विकास यामध्ये यामुळे वाढ होईल. अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नाला करात सूट दिल्याचे अधोरेखित करत सर्व उत्पन्न गटातील व्यक्तींच्या करात कपात केल्यामुळे मध्यम वर्गाला आणि नव्यानेच नोकरीला लागलेल्यांना त्याचा फार मोठा फायदा होणार असल्याचे पंतप्रधान म्हणाले.



अर्थसंकल्पात सुधारणांसाठी लक्षणीय उपयायोजना करण्यात आल्या आहेत, असे सांगून खाजगी क्षेत्राला अणु उर्जा क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा निर्णय ऐतिहासिक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले की, भविष्यात देशाच्या विकासामधे नागरी अणु उर्जेचे योगदान लक्षणीय असेल. अर्थसंकल्पात रोजगारनिर्मितीच्या सर्व क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. जहाजबांधणी क्षेत्राला पायाभूत सुविधा क्षेत्राचा दर्जा दिल्यामुळे भारतात मोठी जहाजे बांधण्याला चालना मिळेल, आत्मनिर्भर भारत अभियानाला गती मिळेल आणि ५० पर्यटन स्थळांवर पायाभूत सुविधा श्रेणीमध्ये हॉटेल्सचा समावेश केल्यामुळे पर्यटनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असाही विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

राज्यांमध्ये गुंतवणुकीसाठी उत्साहाचे आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यावर अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे, याकडे लक्ष वेधून पंतप्रधानांनी एमएसएई आणि स्टार्ट-अपसाठी पत हमीत दुपटीने वाढ करण्याच्या घोषणेवर प्रकाश टाकला.

## बजेटमधील महत्त्वाचे मुद्दे!

नवी दिल्ली : संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेला केंद्रीय अर्थसंकल्प आज संसदेत सादर करण्यात आलं. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ८ व्यांदा हे बजेट मांडलं. यंदाच्या अर्थसंकल्पात सामान्य जनता, नोकरदार, शेती, शिक्षण, रेल्वे आणि आरोग्यबद्दल महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. महत्त्वाच म्हणजे निर्मला सीतारमण यांनी टॅक्स स्लॅबाबत कोणतीही घोषणा केली नाही. पुढील आठवड्यात नवीन आयकर विधेयक सादर केलं जाईल असं त्यांनी सांगितलं. ज्येष्ठ नगरिकांना टॅक्समध्ये दिसाला देण्यात आलाय. आयकर फाईन करण्यासाठी मर्यादा ४ वर्षासाठी वाढविण्यात आली आहे. मध्य वर्गासाठी मोठी घोषणा, १२ लाखांपर्यंत टॅक्स नाही. टीडीएसमधील घरभाड्याची मर्यादा वाढवण्यात आली. दरम्यान केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मधील महत्त्वाच्या मुद्द्यांवर एक नजर टाकूयात




**अर्थसंकल्प २०२५**
**महत्त्वाचे मुद्दे**

१ महिला आणि शेतकरी या घटकांकडे अर्थसंकल्पात विशेष लक्ष
२ अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रात गुंतवणुकीला प्राधान्य
३ पंतप्रधान धनधान्य कृषी योजना, १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत
४ ग्रामीण महिला आणि तरुणांकडे विशेष लक्ष्य
५ डाळींसाठी ६ वर्षे आत्मनिर्भरता योजना लागू
६ फळं, भाजी उत्पादकांसाठी विशेष योजना
७ बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापना, लक्षद्वीप आणि अंदमान निकोबारसाठी बोर्ड
८ कापूर उत्पादकांवर भर देण्यासाठी नवीन योजना आणणार
९ मागास वर्गातील महिलांसाठी नवी योजना, ५ लाख महिलांना लाभ होणार
१० स्टार्ट अप्ससासाठी १० कोटीवरुन २० कोटींची क्रेडीट लिमिट
११ चामड्याची पादत्राणं बनवण्यांसाठी विशेष योजना
१२ भारताला खेळण्यांचा क्षेत्रात ग्लोबल हब बनवणार
१३ पूर्वोत्तर राज्यांत अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देणार
१४ वैज्ञानिक संशोधनाला चालणा देण्यासाठी वर्षाचा कार्यक्रम
१५ भारतीय भाषांमधील पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणार
१६ आयआयटींची क्षमता वाढवली, ६५०० जागा वाढवल्या
१७ एआयच्या अभ्यासासाठी तीन केंद्र
१८ कृषी, आरोग्य इनोव्हेशनमध्ये एआय
१९ वैद्यकीय महाविद्यालयात पुढील ५ वर्षात १० हजार जागा वाढवणार
२० शहरी कामगारांचं जीवन उंचवण्यासाठी विशेष योजना
२१ प्रत्येक जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारणार, पुढील ३ वर्षात सेंटर उभारणार
२२ ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्यांसाठी विशेष योजना
२३ जन भागीदारी योजनेतून ग्रामीण भागात नळाद्वारे पाणी
२४ शहरी भागातल्या विकासकामांसाठी स्वंतत्र निधी, शहरांच्या विकासासाठी १० हजार कोटी
२५ जहाज निर्मिती क्षेत्राकडे विशेष लक्ष्य, अतिविशाल जहाजांचागी योजनेत समावेश
२६ उडान योजना नव्याने स्थापन, पुढील १० वर्षात १२० नवी ठिकाणं जोडणार
२७ पटना विमानतळाचा विकास करणार
२८ २०२५ मध्ये आणखी ४० हजार नागरिकाचं घराचं स्वप्न पूर्ण करणार
२९ ५० नवी पर्यटक स्थळं विकसित करणार
३० खासगी क्षेत्राला गतीशक्ती डेटा पुरवणार
३१ सोप्या पद्धतीने व्हिसा देण्याची सोय करणार
३२ पुढील ५ वर्षात १० हजार फेलिशीप
३३ कर्करोगाच्या सर्व औषधी पूर्णपणे करमुक्त करण्यात येणार आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी संबंधित ३६ औषधे पूर्णपणे करमुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच इतर जीवनावाश्यक औषधांच्या किंमती कमी करण्यात येणार आहे.
३४ इंडिया पोस्टचे एका मोठ्या सार्वजनिक लॉजिस्टिक संस्थेत रुपांतर करण्यात येणार आहे.
३५ सूक्ष्म उद्योगांसाठी श्एश्ए क्रेडिट गॅरंटी कव्हर ५ कोटी रुपयांवरून १० कोटी रुपयांपर्यंत वाढवले जाणार आहे. पुढील पाच वर्षात १.५ लाख कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज प्रदान केले जाईल. किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत कर्ज मर्यादा ३ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करणार
३६ विमा क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणुकीस मान्यता
३७ ७ टॅरिफ रेट्स हटवण्यात आल्याची माहिती
३८ ८२ गोष्टींवरून सोशल वेल्फेअर सरचार्ज हटवला असून ३६ महत्त्वाची औषध कस्टम्स ड्युटीतून वगळण्यात आली आहे.
३९ कॅन्सरच्या औषधांवरील आणि मोफत वाटप होणाऱ्या औषधांवरील कस्टम्स ड्युटी हटवण्यात आली आहे.

## अर्थचक्राला गतिमान करणारा अर्थसंकल्प

काल संसदेत सादर झालेल्या आर्थिक पाहणी अहवालात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर हा ६.३ ते ६.८ टक्के असेल, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच गुंतवणूक, व्यापार यांसह अन्य क्षेत्रांतही वृद्धीचे संकेत या अहवालाने दिले आहेत. त्यामुळे पाहणी अहवालातील अर्थवृद्धीची आशा आणि आज सादर होणारा केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या अर्थचक्राला अधिक गतिमान करणारा ठरेल. लोकसभेत आर्थिक वर्ष २०२४-२५साठीचा, आर्थिक पाहणी अहवाल काल सादर करण्यात आला. या अहवालाद्वारे आर्थिक वर्षातील अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यांकन तर केले जातेच, त्याशिवाय देशासमोरील आर्थिक आव्हानांची रूपरेषा संसदेत मांडली जाते. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अर्थव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी, सरकारकडून वार्षिक दस्तऐवज सादर केले जातात, त्यालाच 'आर्थिक पाहणी अहवाल' असे संबोधले जाते. यंदा सादर केलेल्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ सालासाठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर हा ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. येणार्या आर्थिक वर्षासाठी ६.३ ते ६.८ टक्के जीडीपी वाढ ही, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आशावादी दृष्टिकोन दर्शवणारी आहे. महामारी आणि त्यानंतरच्या जागतिक अनिश्चिततेच्या आर्थिक आव्हानांना यशस्वीपणे तोंड दिल्यानंतर, भारतीय अर्थव्यवस्थेने राखलेला हा दर कौतुकास्पद असाच आहे. जागतिक वाढीचा दर ३.२ टक्के इतकाच असताना, तसेच देशाची वाढ मंदावली आहे असा कांगावा विरोधकांकडून केला जात असताना, भारताची ६.८ टक्के दराने होणारी वाढ ही दिलासादायक अशीच. या वाढीच्या अंदाजात अनेक घटक योगदान देत आहेत. केंद्र सरकारने राखलेले धोरणसातत्य तसेच देशात मोठ्या प्रमाणात होत असलेली खासगी गुंतवणूक, या वाढीला चालना देत आहेत. त्याशिवाय, मजबूत देशांतर्गत मागणी तसेच ग्राहक खर्च, हे या वाढीचे प्रमुख चालक आहेत. देशभरात सुरू असलेले पायाभूत सुविधा प्रकल्प आणि उत्पादन क्षेत्रातील सुधारणा, उत्पादकता आणि आर्थिक उत्पादन वाढवणार आहेत. तथापि, जागतिक आर्थिक अस्थिरता, चलनवाढीचा दबाव आणि भू-राजकीय तणाव, विशेषतः अमेरिका आणि चीनसारख्या प्रमुख अर्थव्यवस्थांमधील संभाव्य अडचणींबद्दल जागरूकता दर्शवितो. हे घटक व्यापार आणि गुंतवणूक प्रवाहांवर परिणाम करू शकतात. त्यासाठीच थोडा सावध आर्थिक दृष्टिकोन आवश्यक आहे. भारताच्या वाढीचा हा दर देशाला जागतिक अर्थव्यवस्थेतील, एक प्रमुख खेळाडू म्हणून ओळख प्रदान करणारा ठरणार आहे. २०४७ सालापर्यंत भारताला 'विकसित राष्ट्र' म्हणून ओळख प्रदान करण्याचा संकल्प, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोडला आहे. 'विकसित भारता'चे उद्दिष्ट साध्य करायचे असेल, तर किमान पुढील दीड ते दोन दशके भारताच्या वाढीचा वेग सरासरी आठ टक्के राखण्याचे आव्हान केंद्र सरकारसमोर असेल. गेल्या वर्षी भारताने आठ टक्के दराने वाढ केली होती. तथापि, जगभरातील वाढत्या भू-राजकीय तणावांमुळे, वाढीचा हा दर तुलनेने कमी असाच आहे. त्याचवेळी, येणार्या काळातील आर्थिक तसेच राजकीय परिस्थितीवर हा दर साधला जाईल का? हे स्पष्ट होईल, असे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच जगाचे उत्पादन केंद्र म्हणूनही भारत उदयास येत आहे, वास्तविक ही चीनची ओळख आहे. चीनला मागे टाकत, भारताला हा भीमपराक्रम साध्य करायचा आहे. त्यासाठीच भारताने वाहनउद्योग, खनिजे आणि नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प यांच्याकडे, लक्ष केंद्रित केलेले दिसून येते. मात्र, भारताची आर्थिक वाटचाल ही चीनवर अवलंबून आहे, हे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. जागतिक उत्पादन तसेच ऊर्जा क्षेत्रातील चीन एक प्रमुख देश असून, त्यामुळेच जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याला तो कारणीभूत ठरला. म्हणूनच, जग आज भारताकडे आशेने पाहत आहे. जागतिक पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी, भारत जगभरातील प्रमुख देशांना मदत करणार आहे. स्पर्धात्मकता तसेच आर्थिक धोरणांचा फायदा घेत, भारताला आपले स्थान मजबूत करावे लागणार आहे. सन २००० मध्ये आशिया, युरोप आणि लॅटिन अमेरिकेतील, अमेरिका आणि त्याच्या मित्रराष्ट्रांचा जागतिक औद्योगिक उत्पादनात मोठा वाटा होता. दोन दशकांच्या वेगवान विकासानंतरही चीनचा दर केवळ सहा टक्के इतकाच होता. आज जागतिक उत्पादनात, चीनचा वाटा ४५ टक्के इतका आहे. त्याचवेळी, चीनसमोरील वित्तीय संकट तीव्र झाले आहे. चीनची वाढ मंदावली आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. चीनवर कर्जाचा मोठा बोजा असून, विशेषतः तेथील रिअल इस्टेट क्षेत्र संकटात सापडले आहे. चिनी अर्थव्यवस्थेत लक्षणीय मंदी आल्याने, त्याचा भारतावर परिणाम होऊ शकतो. चीनमधील आर्थिक संकट जगाची चिंता वाढवणारे ठरू शकते. त्यासाठीच त्याला एक समर्थ पर्याय का आवश्यक आहे? हेही अधोरेखित होते. आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी भारताला राजकोषीय स्थिती मजबूत करणे, निर्यात बाजारपेठेत विविधता आणणे, विदेशी गंगाजळीत वाढ करण्यासाठी तसेच वित्तीय क्षेत्राची लवचिकता सुधारण्यासाठी, ठोस उपाययोजना राबवाव्या लागणार आहेत. अमेरिका आणि चीन यांच्यातील वाढते तणाव, चीनच्या विकासावर थेट परिणाम करणार आहेत. आर्थिक सर्वेक्षणात असा इशारा देण्यात आला आहे की, 'एआय'मुळे मोठ्या प्रमाणात होणार्या नोकर्यांच्या विस्थापनामुळे, सरकारी कर वाढण्याची आवश्यकता असू शकते. 'एआय' रोजगारांची संख्या कमी करेल, असे यातून सुचित करण्यात आले आहे. 'एआय' मानवी रोजगाराची जागा घेत असल्याने, कर आधार कमी होत जाईल, अशी शंका व्यक्त करण्यात आली आहे. महसूल कमी झाल्यास, सरकारी योजनांना त्याचा फटका बसू शकतो. तसेच विस्थापित झालेल्या कर्मचार्यांसाठी, सामाजिक योजना राबवणे सरकारला भाग पडू शकते. म्हणजेच, 'एआय' उत्पादकता वाढवून आर्थिक वाढीला चालना देणार असली, तरी प्रत्यक्ष कर देणार्या व्यक्तींची संख्या 'एआय' कमी करेल. यासाठी पर्यायी महसूल पर्यायांचा शोध घेणे, तसेच विद्यमान कर संरचना समायोजित करणे आवश्यक होईल. एकूणच, हे सर्वेक्षण आशावादी आर्थिक दृष्टिकोन सादर करणारे आहे. जागतिक अनिश्चितता असूनही, स्थिर वाढ आणि महागाई कमी होणे यांची गरज यात आहे. अर्थव्यवस्था चढउतारांना चांगल्याप्रकारे तोंड देत असून, उत्पादन, सेवा आणि शेतीसह विविध क्षेत्रांमध्ये लवचिकता असल्याचे यातून स्पष्ट होते. तसेच, ग्राहकांचा विश्वास वाढीस लागण्यासाठी तसेच गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, ही सुसंगतता महत्त्वाची अशीच आहे. महागाई कमी करण्याचे आव्हान सरकारसमोर असेल. महागाई वाढल्यामुळे ग्राहकांची क्रयशक्ती कमी होईल आणि ही कमी झालेली क्रयशक्ती वाढ मंदावणारी ठरेल. म्हणूनच, सरकारला महागाई नियंत्रणात आणावी लागणार आहे. केंद्र सरकारला वाढीचा दर कायम राखण्याबरोबरच, चलनवाढीवरही लक्ष ठेवावे लागेल. उत्पादन क्षेत्राला चालना देणे आणि त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागणार आहे. आर्थिक अहवालाने भारताच्या वाढ कायम राखण्याचे दिलेले हे संकेत, दिलासादायक असेच आहेत.

# महिलेच्या पोटातून चक्क काढलं तब्बल १ किलो ६७० ग्रॅमचा दगड, दुर्मिळ शस्त्रक्रिया गोंदियात झाली यशस्वी

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** महिलेच्या पोटातून तब्बल १ किलो ६७० ग्रामचा वजनाचा मोठा दगड (किडनी स्टोन) काढण्यात आला, ते पाहून डॉक्टरांनाही आश्र्चर्याचा धक्का बसला.असे म्हणतात की डॉक्टर हे पृथ्वीवरील देवाचे रूप आहेत, जे त्यांच्या उपचारातून रुग्णांना नवजीवन देतात. महाराष्ट्रातील गोंदियामध्ये अशीच एक दुर्मिळ शस्त्रक्रिया करण्यात आली, ज्याने सर्वांनाच आश्र्चर्याचा धक्का बसला. बीजे रुग्णालयातील डॉ. विकास जैन, गोंदियाचे प्रख्यात लॅप्रोस्कोपिक आणि यूरो सर्जन विकास जैन यांनी एका महिला रुग्णाला तिच्या पोटातून १ किलो ६७० ग्रामाचा किलोचा दगड (किडणी स्टोन) काढून असह्य वेदनांपासून मुक्त केले. वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टिकोनातून ही शस्त्रक्रिया दुर्मिळ मानली जाते.



किसनाबाई सहारे (५२) हे मूळचे मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील वाराशिवनी शहराचे असून गेल्या तीन वर्षांपासून त्यांना असह्य वेदना होत होत्या. त्यांचे पती रोजंदारीवर काम करतात आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांना मोठ्या शहरात उपचार घेता आले नाहीत. स्थानिक डॉक्टरांनी त्याला फक्त





वेदनाशामक औषधे दिली, परंतु त्याचे दगड इतके मोठे असू शकतात याचा अंदाज कोणालाही आला नाही. नुकतेच वेदना असह्य झाल्यामुळे त्यांची मोठी मुलगी जिचे लग्न गोंदियात झाले आहे तिने आपल्या आईला डॉ. विकास जैन यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी एक्स-रे काढून पहले असता त्यामध्ये असे दिसून आले की महिलेच्या पोटात (मूत्राशयात) असामान्यपणे जड दगड आहे, ज्यासाठी त्वरित ऑपरेशन आवश्यक आहे. महिलेची गंभीर स्थिती आणि ऑपरेशनची गुंतागुंत लक्षात घेऊन डॉ. विकास जैन यांनी त्यांच्या टीमसह दोन तासांची शस्त्रक्रिया केली. आणि त्यांनी महिलेच्या पोटातून (मूत्राशयातून) दगड (किडणी स्टोन) काढायला सुरुवात केली तेव्हा त्याचा आकार आणि वजन पाहून सर्वांनाच आश्र्चर्य वाटले. १ किलो ६७० ग्रामचा वजनाचा हा दगड (किडणी स्टोन) हा आतापर्यंतच्या दुर्मिळ शस्त्रक्रियांपैकी एक आहे.

तर डॉ. विकास जैन यांनी या आधी देखील अश्या अनेक दुर्मिळ शस्त्रकिया केल्या असून त्यांच्या या कार्याची दखल एशिया बुक ऑफ रेकॉर्ड ने घेतली आहे. तर त्यानी आपल्या कार्याची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड यांच्या कडे देखील नोंदविली आहे तर कृष्णां सहारे याना होणाऱ्या किडनी स्टोनच्या त्रासापासून मुक्तता मिळाल्याने सहारे कुटूंबियांनी डॉ. विकास जैन यांचे आभार मानले आहे.

## क्रूरतेचा कळस, आधी अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार नंतर व्हिडिओ काढून...; धक्कादायक घटनेने वसई हादरले

**वसई/प्रतिनिधी :** नालासोपर्यामध्ये वास्तव्यास असणाऱ्या एका अल्पवयीन मुलीचा अील व्हिडिओ तयार करून तिच्यावर चौघांनी सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचे संतापजनक प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी पीडित मुलीने तक्रार दिल्यानंतर शुक्रवारी आरोपींना अटक करण्यात आली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिच्या अील व्हिडिओ काढून त्याद्वारे तिला ब्लॅकमेल करण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. पीडित मुलीने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर शुक्रवारी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही संतापजनक घटना १७ जानेवारी रोजी घडली आहे. पीडित मुलगी नालासोपारा पूर्वेला राहते. तिच्या परिसरातीच राहणाऱ्या अयान नावाच्या मुलाने तिला चांद पठाण या आरोपीच्या घरी नेले. तेथे अयान आणि चांद यांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर चांद पठाण आणि अमीर अन्सारी यांनी तिच्या अील व्हिडिओ क्लिप्स तयार केल्या आणि तिला धमकी दिली की, जर तिने ही घटना कोणाला सांगितली तर तिचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला जाईल. या धमकीमुळे पीडित मुलगी प्रचंड घाबरली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिला सलमान खान ( वय वर्षे १९) नावाच्या आरोपीने तिला फोन करून तिच्या व्हिडिओचा उल्लेख करून ब्लॅकमेल केले आणि तिला आपल्या घरी बोलावले. तेथे सलमानने तिच्यावर पुन्हा लैंगिक अत्याचार केला आणि तिचे अील फोटो काढले. अखेर पीडित मुलीने गुरुवारी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## हत्येआधीच मृतदेह फेकण्यासाठी रेकी, जागा निवडली, शिवसेना नेते अशोक धोडी हत्या प्रकरणात धक्कादायक खुलासे

दैनिक आपला विदर्भ

**पालघर/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाचे नेते अशोक धोडी यांच्या हत्येच्या अनुषंगाने पोलीस तपासातून धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. त्यांचा खून त्यांच्या भावानेच केल्याचा संशय बळावला असून तो सध्या फरार आहे.

मृत अशोक धोडी आणि मुख्य सूत्रधार आरोपी अविनाश धोडी यांचा मागील काही वर्षापासून कौटुंबिक वाद होता. त्यातच आरोपी अविनाश धोडी यांचा दमन आणि दादरा नगर हवेली येथील दारू अवैधरित्या महाराष्ट्रात आणून विकण्याचा व्यवसाय होता. या व्यवसायात अशोक धोडी अडचण ठरत असल्याने त्यांनी अनेक वेळा अशोक धोडी यांच्यावर हल्ले देखील केले होते.

अशोक धोडी यांचं २० जानेवारीला अपहरण आणि हत्या करण्यापूर्वी आरोपींनी त्यांच्या घरासह त्यांची गाडी आणि गुजरातम धील सरिग्राम येथे मृतदेह विल्हेवाट लावण्यासाठी निवडण्यात आलेली बंद दगडखान यांची महिनाभरापासून रेकी केली होती.

कोणत्या आड मार्गाने गेल्यास आपण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात सापडणार नाही याचा अंदाज आरोपींनी महिनाभर आधीच घेतला होता. त्यातच अवैध दारू तस्करी करत असल्याने या आरोपींना आडमार्गाचा चांगलाच अनुभव होता. अपहरण आणि हत्यानंतर आपल्यावर संशय येऊ नये म्हणून आरोपींनी आपले सर्व मोबाईल एकाच ठिकाणी ठेवले असून पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आपण त्या दिवशी एकाच ठिकाणी बसून रात्रभर पार्टी करत असल्याचे भासविण्याचा प्रयत्न केला .

अशोक धोडी यांची लाल कलरची ब्रिझा कार डहाणू रेल्वे स्थानकाच्या पार्किंगमध्ये उभी असताना या गाडीला आरोपींनी जीपीएस लावल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या जीपीएसच्या आधारावर आरोपींनी अशोक धोडी यांचा पाठलाग केला. झाई बोरीगाव येथील घाटात आयसर टेम्पो अशोक धोडी यांच्या गाडी पुढे लावून मागे पिकअप थांबवली. त्याम ुळे अशोक धोडी यांना पळ काढता आला नाही. याच घाटात आरोपींनी अशोक धोडी यांच्या डोक्यात लोखंडी रॉडने जोरदार वार केले.

पुढे कोणालाही संशय येऊ नये म्हणून अशोक धोडी यांची गाडी घेऊन आरोपी अशोक धोडी यांच्या घराजवळून भरधाव वेगात गेले. काहीच अंतरावर गेल्यावर आरोपींनी मृतदेह आणि गाडीची विल्हेवाट लावण्यासाठी आड मार्ग निवडला. मात्र गुजरातमधील एका रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेरात ही गाडी कैद झाल्याने आणि अटक आरोपींकडून मिळालेल्या माहितीवरून पालघर पोलिसांनी गुजरातमधील दगड खाणींची पाहणी सुरू केली.

पाणी असलेल्या खोल दगड खाणीच्या टेकड्यावर असलेल्या एका दगडाला गाडीच्या बॉडीचा खालचा पार्ट घासला गेला होता, यामध्ये एक लहान सेंसर दगडाला अडकला. पुढे गाडी मृतदेहासह थेट ४० फूट खोल पाण्यात ढकलली , असे पोलिसांना सांगण्यात आले. हाच तुटलेला सेंसर पालघर पोलिसांच्या हाती लागला आणि याच दगड खाणीतील पाण्यात धोडी यांची गाडी आणि मृतदेह असल्याचा पालघर पोलिसांचा संशय बळावला .

## आईने प्रियकरासोबत मुलाच्या हत्येचा रचलेला कट उधळला

दैनिक आपला विदर्भ

**कराड/प्रतिनिधी :** अनैतिक संबंधातून आईने प्रियकरासोबत मुलाच्या हत्येचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार घडला असून, पोलिसांच्या तत्परतेने मुलाचा जीव वाचला आहे. संशयित आरोपींना २४ तासात गजाआड करण्यात तळबीड पोलिसांना यश आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २९ जानेवारी २०२५ रोजी वराडे (ता. कराड) येथील पोलीस पाटील यांनी वराडे गावच्या हद्दीत एक अनोळखी इसम गंभीर जखमी अवस्थेत पडला असल्याची माहिती दिली. या माहितीवरुन, तळबीड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण भोसले हे कर्मचार्यांसह घटनास्थळी पोहचले. जखम ीच्या डोक्यात व डोळ्यास गंभीर जखमा झाल्याचे निदर्शनास आले. तो रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडला होता. त्याला तात्काळ उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनास्थळी फॉरेनसिक्स सायन्सची टीम व डॉगस्कॉड यांना पाचारण करण्यात आले. कराड उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरांनी जखमीला सातारा येथे उपचारासाठी हलविण्यास सांगितले. मात्र, परिस्थिती गंभीर असल्याने त्याला कृष्णा रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेच्या अनुषंगाने पोलीस उपअधीक्षक अमोल ठाकूर यांनी वेगवेगळी पथके तयार करुन तपासाला गती दिली. अनोळखी असलेल्या जखमीची पोलिसांनी समाज माध्यमांच्या (सोशल मीडिया) सहाय्याने ओळख पटवली. त्याचे नाव प्रशांत महादेव शेंडगे (वय २४, रा. शिवडे ता. कराड) असे असल्याचे निष्पन्न झाले. घटनेबाबत अधिक माहिती प्राप्त केली असता, यातील जखमीचा भाऊ व आई हे पुणे येथे राहण्यास असल्याचे समजले. घटनास्थळी मिळालेल्या दुव्यांवरुन पोलिसांनी तपास पथके रवाना केली.

पोलिसांनी तीन संशयित आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे तपास केला असता, संशयित आरोपी जयेंद्र गोरख जावळे (वय ४०, मुळ रा. सांगवी, ता. हवेली जि. पुणे) याचे व जखमीची आई शोभा महादेव शेंडगे (वय ३८ सांगवी, ता. हवेली जि. पुणे) हिचे अनैतिक संबंध होते. शोभा हिचे माहेर शिवडे (ता. कराड) असून, त्याठिकाणीच ती तिच्या मुलांसह राहण्यास आहे. यातील जखमी हा व्यसनाधिन होवून शोभा हिला त्रास देत होता. याकारणावरुन यातील आरोपी जयेंद्र जावळे व शोभा शेंडगे यांनी जयेंद्र याचे दोन साथीदार सिद्धार्थ विलास वाव्हळे (वय २५, मुळ रा. मातोश्रीनगर, जि. परभणी. सध्या रा. राजयोग गार्डन, ता. हवेली जि. पुणे) व अकबर मेहबुब शेख (वय २५, रा. निकाळजेवस्ती, ता. हवेली जि. पुणे) यांच्यासह प्रशांत शेंडगे यास जिवे मारण्याचा कट रचला असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे संशयित आरोपींनी पुणे येथून रिक्षाने येऊन प्रशांत यास उंब्रज येथे रिक्षात घेऊन त्यास वराडे येथील शेतात नेले. त्यास दारु पाजून त्याचा दगडाने ठेचून खून करण्याचा प्रयत्न केला. परंतु, तेथील स्थानिक नागरिक व पोलिसांच्या सतर्कतेमुळे जखमी प्रशांतचा जीव सुदैवाने वाचला असून, त्याच्यावर कृष्णा हॉस्पिटल येथे तात्काळ उपचार झाल्याने त्याची प्रकृती स्थिर आहे. पोलिसांनी सदर गुन्हा तात्काळ उघडकीस आणून गुन्ह्यातील निष्पन्न आरोपींना २४ तासांच्या आत अटक केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास तळबीड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण भोसले हे करीत आहेत.

# उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय! आईच्या मालमत्तेवर मुलांचा हक्क नाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय कायद्यात म हिलांना मालमत्तेशी संबंधित अनेक अधिकार देण्यात आले आहेत. जर कोणी तिला तिच्या मालमत्तेचे अधिकार हिरावून घेण्याचा किंवा तिच्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला तर ती न्यायालयात जाऊ शकते. अशातच दिल्लीतील उच्च न्यायालयाने महिलांच्या हक्कांबाबत एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला मालमत्तेचा वापर करण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने असेही म्हटले आहे की मुलगी आणि जावई आईच्या मालमत्तेवर हक्क सांगू शकत नाहीत.

नेमकं काय आहे प्रकरण?

उत्तर-पश्चिम दिल्लीतील शास्त्री नगर येथील रहिवासी ८५ वर्षीय लाजवंती देवी नावाच्या महिलेने त्यांच्या मुली आणि जावयाविरुद्ध मालमत्तेवर कब्जा केल्याबद्दल न्यायालयात तक्रार दाखल केली होती. खटल्याची सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने महिलेच्या बाजूने निर्णय दिला. परंतु न्यायालयात वृद्ध महिलेच्या हक्कांना आव्हान देत, मुलगी आणि जावयाने महिलेच्या घराचा काही भाग सोडण्यास नकार दिला.



याचिकेत लाजवंती देवी म्हणाल्या की, मी माझ्या घराची मागणी करत आहे. जे मी १९८५ मध्ये मी मुलगी आणि जावई यांना राहण्यासाठी दिले होते. ते घर रिकामे करण्यास त्यांनी नकार दिला आहे. यावर महिलेला घराची मालकीण मानून न्यायालयाने म्हटले की, पतीने ही म ालमत्ता १९६६ म ६ य` पत्नीच्या नावावर खरेदी केली होती. जेणेकरून तो मृत्यूनंतर सुरक्षित जीवन जगू शकेल. त्याम ुळे महिलेची मुलगी आणि जावई यांना त्यांच्या परवानगीने घरात राहण्याचा अधिकार आहे आणि त्यांना महिलेच्या हक्कांचे उल्लंघन करण्याची परवानगी देता येणार नाही. म्हणून मुलगी आणि जावई यांनी सहा महिन्यांच्या आत घर रिकामे करावे असे आदेश दिले आहेत.

दरमहा १० हजार द्यावे लागणार


२०१४ मध्ये खटला सुरू झाल्यापासून दरमहा १०,००० रुपये भरण्याचे निर्देश न्यायालयाच्या निर्णयात देण्यात आले. तसेच, न्यायालयाने म्हटले आहे की जोपर्यंत तो महिलेला मालमत्ता देत नाही तोपर्यंत त्याला दरमहा १०,००० रुपये द्यावे लागणार आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# संक्षिप्त...

## महड वरदविनायक मंदिरात माघी गणेश जयंती उत्सवाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील अष्टविनायक क्षेत्रातील महड येथील वरदविनायक मंदिरात माघी गणेश जयंतीनिमित्त निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.महड वरदविनायक मदिरा तर्फे माघी गणेश जयंती निमित्ताने मंदिरात मोठ्या संख्येने भाविक भक्त दाखल झाल्याचे पहावयास मिळत आहे.सकाळी वरदविनायकाची पूजा ही रायगड जिल्ह्यातील जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते पार पडली.तसेच दुपारी गणेश जन्माचे आयोजन करीत ह. भ.प.चारुदत्त आफळे यांच्या किर्तनाने गणेश जन्म सोहळा पार पडला.गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी अर्थसंकल्पावर दिली प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी निराशाजनक पोकळ घोषणा आणि मोठमोठ्या वल्गणा या व्यतिरिक्त अर्थसंकल्पात काहीही नाही रासायनिक खताच्या वाढत्या किंमती आणि किंमत नियंत्रित करण्यासाठी खतावरील सबसिडीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतलाय असं दिसत नाही वाढत्या उत्पादन खर्चावर नियंत्रण करण्यासाठी काहीही उपाययोजना केलेल्या दिसत नाहीत शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करायचा असेल तर हमीभावाचा कायदा करून द्यायला हवा किसान क्रेडिट कार्ड तीन लाखावरून पाच लाखावर केले मात्र शेतकऱ्याचा कर्ज वाढवून काय उपयोग या योजना नेमक्या कोणासाठी आणि कशासाठी आहेत हे कळत नाही साखर उद्योगासाठी काहीही केलेलं नाही राजू शेट्टी माजी खासदार यांनी प्रतिक्रिया नोंदवली आहे..

## केंद्रीय अर्थसंल्पावर महाराष्ट्र चेंबरऑफकॉमर्स अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रतिक्रिया




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत आज देशाचे बजेट सादर केलं. २०४७ च्या विकसित भारत बनवण्यासाठी हा अर्थसंकल्प म्हणजे पायाभरणी असेल असं प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केल आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे राज्याच्या व्यापार आणि उद्योग वाढीसाठी केलेलं अनेक प्रस्ताव मान्य करत यंदाच्या बजेटमध्ये त्याची तरतूद केली असल्याने दोघांचेही महाराष्ट्र चेंबर्सच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.

## नामदेव शास्त्रींकडून धनंजय मुंडेंची पाठराखण; पंकजा मुंडेंची पहिली प्रतिक्रिया, राजीनाम्यावरही भाष्य

**जालना/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण, बीडमधील गुन्हेगारी आणि खंडणी प्रकरणावरुन राजकारण चांगलंच तापलं असून मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर वाढता दबाव लक्षात घेऊन धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन महंत नामदेव शास्त्रींची भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली. तर, या भेटीनंतर दुसऱ्याच दिवशी नामदेव शास्त्रींनी धनजंय मुंडेंच्या समर्थनार्थ पत्रकार परिषद घेऊन धनंजय गुन्हेगार नाही हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो असे त्यांनी म्हटले. तसेच, खून करणाऱ्या आरोपींच्या मानसिकतेचा विचार व्हावा, अशीही प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. त्यावरुन, सोशल मिडिया व राजकीय वर्तुळातून नामदेव शास्त्रींवर टीकेची झोड उठली.

# महिला आणि युवांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणारा अर्थसंकल्प : केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** केंद्रीय युवा कार्यक्रम आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांनी आज २०२५-२६ च्या केंद्रीय बजेटचे स्वागत करत हे बजेट भारतातील महिला आणि युवांच्या विकासावर लक्ष केंद्रित केल्याचे त्यांनी सांगितले. बजेट सादरीकरणानंतर माध्यमांसमोर बोलताना, मंत्री खडसे यांनी विविध लक्षित योजनांद्वारे महिलांना सशक्त बनवण्याचे आणि देशातील तरुणांना महत्त्वपूर्ण संधी प्रदान करण्याच्या सरकारच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे कौतुक केले. पुढे बोलताना त्यांनी २०२५-२६ च्या केंद्रीय बजेटने परत एकदा सरकारच्या स्वयंपूर्ण आणि प्रगतीशील देशाच्या दृष्टीकोनाचे दर्शन घडवले आहे, ज्यात युवाशक्ती, क्रीडा विकास, शेतकऱ्यांचे कल्याण आणि महिला सक्षमीकरणावर विशेष लक्ष देण्यात आले आहे, असे सांगितले.

२०२५-२६ च्या बजेटचा एक प्रमुख मुद्दा म्हणजे महिलांच्या उद्योजकतेला समर्थन देणारी नवीन योजना, ज्यामध्ये विशेषतः अनुसूचित जाती (डउ) आणि अनुसूचित जमाती (डढ) वर्गातील व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांना समर्थन दिले जाणार आहे. या योजनेंतर्गत सरकार २ कोटी रुपयांपर्यंतच्या विशिष्ट कालावधीसाठी कर्ज परतफेडीचे स्वरूप निश्रि्चत (टर्म लोनची) योजना आखत आहे, ज्याचा लाभ येत्या पाच वर्षांत सुमारे ५ लाख महिलांना होईल. यामुळे कर्ज मिळवण्यात अडचणी असलेल्या महिलांना भांडवल उपलब्ध होईल. पुढे बोलताना मंत्री खडसे म्हणाल्या, आपल्या देशाचे पंतप्रधान महिलांना पुढे आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत आणि एकदा परत या बजेटमध्ये महिलांना पुढे



आणण्यासाठी सर्व सुविधांचा पुरवठा केला गेला आहे, जे आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरक ठरतील.

मंत्री खडसे यांनी क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी आणि सुधारणेसाठी संसाधनांच्या वाटपावर भर दिल्याचे सांगितले ज्याचा लाभ महिला वर्गासाठी संजीवनी ठरणार आहे. सरकारच्या अशा पुढाकारांमुळे एकूण क्रीडा परिसंस्था सुधारून महिलांना अनेक स्तरांवर सहभागी होण्याच्या नवीन संधी मिळतील. युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालयासाठी वाढीव बजेट वितरीत केलेली रक्कम दुर्गम भागांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांना आणि प्राथमिक विकासासाठी प्रोत्साहन देईल, जेणेकरून स्पर्धात्मक वातावरणात महिलांना अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व करण्याची संधी निर्माण होईल.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी जाहीर केलेल्या नवीन योजनांमध्ये कापूस तंत्रज्ञान मिशनचा समावेश झाल्याने ग्रामीण आणि दुर्गम भागातील तरुणांसाठी अनेक संधी निर्माण होतील. या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल आणि महिलांना त्यांच्या समुदायांमध्ये नेतृत्वाची भूमिका साकारण्यास सक्षम बनवेल असा विश्र्वास श्रीमती खडसे यांनी व्यक्त केला. भारताच्या २०४७ पर्यंतच्या विकसीत देश होण्याच्या संकल्पाचा ठराव देशाचे पंतप्रधान मोदी यांच्यासह देशाच्या नागरिकांनी घेतला आहे आणि आज या बजेटमुळे आम्ही भविष्यकाळात त्याची पूर्तता झाल्याचे नक्कीच पाहू.

## ऑनलाइन फ्रॉड करणाऱ्या टोळीस अटक नऊ मोबाईल, बारा डेबिट कार्ड, १७ चेकबुक हस्तगत करण्यात पोलिसांना यश

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील फातिमा नगर येथे गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली होती काही इसम वेगवेगळ्या लोकांच्या नावाने बँक खाते खोलून ऑनलाइन फ्रॉड करून त्यांचे बँक खात्यात पैसे आल्यानंतर पैसे काढून लोकांचे फसवणी करत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी १)अब्दुल रब अब्दुल अहाद अन्सारी २३ वर्ष , २)आतिक अहमद वय वर्ष २० राहणार शांतीनगर , ३)सैफ सलीम अन्सारी १७ वर्ष ,४) मोहम्मद बशर जकी उल्ला अन्सारी २० वर्ष , ५)मोहम्मद जैद अन्सार



अन्सारी १७ वर्ष यांच्याकडून १२ मोबाईल वेगवेगळ्या बँकेचे १२ डेबिट कार्ड,१७ चेक बुक एक पासबुक, दोन पॅन कार्ड असे एकूण ७० हजार रुपयांचा किमतीचा मुद्द्यामाल त्यांच्याकडून ताब्यात घेतला असून वरील बँक खात्याची माहिती प्राप्त करून आंतरराष्ट्रीय सायबर अपराध रिपोर्टिंग पोर्टल चेक केले असता आरोपींकडून मिळालेले भारतातील वेगवेगळ्या शहरात मधील, देहेरी पोलीस स्टेशन बिहार राज्य, तामिळनाडू कोईमतुर सिटी, तामिळनाडू, भिवडी पोलीस स्टेशन राजस्थान, नारायणपुरा पोलीस स्टेशन अहमदाबाद, हिन्नूर पोलीस स्टेशन बेंगलोर कर्नाटक या ठिकाणाहून बँक खात्यात ऑनलाईन रक्कम ट्रान्सफर झाल्याचे बँक खाते फ्रीज करण्यात आल्याची माहिती झाल्याने सदरचे इसम हे ऑनलाइन फ्रॉड करणारे ही सम असल्याची खात्री झाल्याने बँक खात्याची पत्रव्यवहार केल्यावर आठ बँक खात्याची माहिती प्राप्त झाली आहे अद्याप होत प्राप्त झालेले बँक स्टेटमेंट नुसार बँक मध्ये सुमारे ३५ लाख रुपये रक्कम वर्ग झाली असून सदरची रक्कम वर्ग झाल्यानंतर तात्काळ बँक खात्यातून काढून घेतल्याचे निष्पन्न झाले असून उर्वरित बँक खात्याची माहिती प्राप्त करीत असून गुन्ह्याचा तपास शांतीनगर पोलीस स्टेशन करत आहे.

## जळगावात जीबीएस आजाराचा रुग्ण आढळल्यानंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी शासकीय रुग्णालयात केली पाहणी





दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगावात जीबीएस आजार आढळलेल्या महिला रुग्णाची प्रकृती स्थिर असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व्यवस्थित उपचार सुरू आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता लक्षणे दिसल्यास सरकारी रुग्णालयात तपासणीसाठी यावे, अशी माहिती राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. राज्यभरात गुलेन बारे सिंड्रोम अर्थात जीबीएस आजाराचा पहिला रुग्ण जळगाव तालुक्यात आढळून आला आहे. विशेष म्हणजे कुठलीही ट्रॅव्हल्स हिस्ट्री नसताना मात्र एका ४५ वर्षीय महिलेला हा आजार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वैद्यकीय पथकाच्या निगराणीखाली उपचार सुरु असलेल्या या महिलेच्या प्रकृतीची पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आले होते. यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जीबीएस आजारा संदर्भात आरोग्य विभागाच्या तयारीचा देखील आढावा घेतल्याचे पाहायला मिळाले..

## चोरी गेलेले १० लाख २० हजाराचे ५० महागडे मोबाईल तक्रारदार ला परत करण्यात आले; मुंबई नाका पोलिसांनी कामगिरी




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मोबाईल फोन गहाळ झाला किंवा चोरी झाला तर ते परत मिळत नसल्याच अनुभव बऱ्याच लोकांना आलं मात्र नाशिक पोलिसांनी हे सिद्ध करून दाखवले की गहाळ किंवा चोरी गेलेले मोबाईल परत मिळतात मुंबई नाका पोलिसांनी १० लाख २० हजारांचे जवळपास ५० मोबाईल शोधून मूळ मालकांना दिले आहे. नाशिक शहर व परिसरात मोबाईल चोरण्याचे तसेच गहाळ होण्याच्या अनेक तक्रारी रोज विविध पोलीस स्टेशनला प्राप्त होत असतात त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी प्रत्येक पोलीस स्टेशनला सी ई आय आर प्रणाली अंतर्गत गहाळ झालेले मोबाईलचा शोध घेण्याबाबत सूचना केले आहे. त्या अनुषंगाने मुंबई नाका गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार समीर शेख यांनी सी इ आय आर प्रणाली द्वारे तसेच तांत्रिक विश्र्लेषण विभागाचे मदतीने एकूण १० लाख २० हजार रुपये किमतीचे एकूण ५० महागडे मोबाईल फोन शोधून आज मुंबई नाका पोलीस ठाण्यात तक्रारदार यांना परत करण्यात आले. यामध्ये आय फोन. सॅमसंग वन प्लस रेडमी विवो oppo आयटेल मोटो यासारख्या विविध कंपन्यांचे नागडे मोबाईल आहे. तक्रारदार यांना त्यांचे हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी नाशिक शहर पोलिसांचे विशेष आभार मानले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांना फेब्रुवारी महिन्यात 'इतक्या' सुट्ट्या! पाहून घ्या कॅलेंडर!

**मुंबई/प्रतिनिधी :** नवीन महिना आल्यावर अनेक नियमांमध्ये बदल होतात. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या दिवशीच अर्थसंकल्प जाहीर करण्यात आलाय. त्यामुळे सामान्य नागरिकांना आपल्या दैनंदिन आयुष्याशी निगडीत अनेक गोष्टींवर होणारा बदल लक्षात आला असेल. दरम्यान शालेय विद्यार्थी आणि त्यांचे पालक दरमहिन्याच्या पहिल्या दिवशी एकूण सुट्ट्या तपासतात. शालेय सुट्ट्यांप्रमाणे पालक विकेंडचा प्लान ठरवतात. विद्यार्थी एन्जॉय करायला किती दिवस आहेत, हे मोजतात. दरम्यान फेब्रुवारी महिन्यात किती सुट्ट्या मिळणार? जाणून घेऊया.

वसंत पंचमीने फेब्रुवारी महिन्याची सुरुवात होतेय. शनिवार १ फेब्रुवारीला असणारा हा सण हा हिंदूंच्या महत्वाच्या सणांपैकी एक सण असून तो २ फेब्रुवारीला साजरा केला जाईल. संत गुरु रविदास यांची जयंती १२ फेब्रुवारीला आहे. या दिवशी बुधवार असून यानिमित्त शाळा-महाविद्यालयांना सुट्टी असेल.

## मराठमोळ्या संस्कृतीची आंतरराष्ट्रीय झेप, सिनेमाची होतेय साता समुद्रापार चर्चा..!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** फॅशन, नृत्य आणि अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घालणारी मराठमोळी अभिनेत्री म्हणजे संस्कृती बालगुडे. कायम चर्चेत असलेली अभिनेत्री संस्कृती बालगुडे ही कायम कमालीच्या आणि तितक्याच आव्हानात्मक भूमिका करताना आजवर दिसली आहे. संस्कृतीने आंतरराष्ट्रीय झेप घेतली आहे. सध्या ती एका चित्रपटासाठी चर्चेत आहे आणि हे कारण देखील तेवढंच खास आहे.

संस्कृती तिच्या 'करेज' या इंग्रजी चित्रपटाची सँटो डोम्निगो यूएसएला फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड झाली असून या चित्रपटाचं खास स्क्रिनिंग तिकडे पार पडलं. 'करेज' हा तिचा पहिला वहिला इंग्रजी चित्रपट असून ती या चित्रपटाचं प्रतिनिधित्व करण्यासाठी गेली आहे. संस्कृतीची ही खास सफर नक्की कशी आहे याबद्दल बोलताना संस्कृती म्हणते, एक मराठी मुलगी एवढ्या मोठ्या फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभाग घेते आणि आपल्या भारताचं प्रतिनिधित्व करते याचा खूप अभिमान आहे. खूप छान वाटतंय. आपल्यावर एक मोठी जबाबदारी आहे याचं थोडं प्रेशर देखील आहेच पण हा अनुभव नक्कीच खूप कमालीचा आणि मस्त असणार आहे. मी यासाठी उत्सुक आहे.

'करेज' चित्रपट अंकुर काकतकर यांनी दिग्दर्शित केला असून डॉ. उदय देवस्कर आणि सुशांत तुंगारे यांनी या खास चित्रपटाची निर्मिती केली आहे. आपण एकदा तरी वुमन ओरिएंटेड चित्रपट करावा ही इच्छा असताना 'करेज' सारखा चित्रपट माझ्या वाट्याला येणं हे भाग्याचं आहे. (कंट्री ऑफ हॉनर) सेक्शनमध्ये आमच्या या चित्रपटाचं स्क्रिनिंग होतंय आणि आम्ही चित्रपटाचं प्रतिनिधित्व करणार आहोत. संस्कृतीने आजवर अनेक विषयांवर आधारित चित्रपट करून त्यात लक्षवेधी भूमिका साकारल्या आहेत. कायम काही वेगळेपणा असलेल्या भूमिका करू शकते याकडे तिचा कल असतो हे यातून बघायला मिळतं. संस्कृतीचा हा पहिला वहिला इंग्रजी चित्रपट असला तरी अगदी साता समुद्रापार तिच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचं प्रेम मिळतंय.



# कॅन्सरसह ३६ औषधांवरील सीमा शुल्क केंद्र सरकारने माफ केल्याने औषधी होणार स्वस्त : केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** कॅन्सरसह ३६ जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क केंद्र सरकारने संपूर्णपणे माफ केल्याने ही औषधे स्वस्त होणार असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे हा अर्थ संकल्प शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, विद्यार्थी सर्व घटकांना विकासाची संधी उपलब्ध करूण , सर्वसामान्य व्यक्तीला दिलासा देणारा आणि देशाला आर्थिक महासत्तेच्या वाटेवर नेणारा असल्याचे ही म्हटले आहे

दिल्ली येथे अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा

## शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, विद्यार्थी सर्व घटकांना विकासाची संधी आणि सर्वसामान्यांना दिलासा देणारा अर्थसंकल्प -केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून अर्थसंकल्पाचे स्वागत



अर्थसंकल्प सादर केला . यामध्ये कॅन्सर सह इतर ३६ औषधांवरील सीमा शुल्क पूर्णतः माफ केल्याने ही औषधे स्वस्त होणार असून त्याचा फायदा सर्व रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना होणार आहे . शिवाय अर्थसंकल्पात शेती, आरोग्य, रोजगार, लघू आणि मध्यम उद्योग, निर्यात, गुंतवणूक, ऊर्जा, नागरिकरण, खाणकाम, अर्थ, कर आदी क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले आहे. शेतकरी, महिला, युवक, गरीब वर्गासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. महिलांच्या कौशल्याविकास प्राथम्याचा विषय आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेंतर्गत शेती उत्पादकता वाढ, शेतमाल साठवणूक सुविधा, सिंचन आणि क्रेडीट सुविधांवर भर देण्यात येणार असून शंभर जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे .

बारा लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीय देशवासियांना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोठी भेट दिली आहे. अर्थसंकल्पातील नव्या कररचनेमुळे १२ लाख उत्पन्न असलेल्या करदात्यांना ८० हजारांची सूट दिल्याने त्यांना शंभर टक्के करमाफी मिळणार आहे. १८ लाख उत्पन्नधारकांना ७० हजारांचा फायदा होणार आहे. २५ लाख उत्पन्न असलेल्यांचा कर १ लाख २५ हजारांनी कमी होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांहून १ लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. . मोबाईल फोन देखील स्वस्त होणार असल्याने देशातील प्रत्येक घराला, व्यक्तीला या निर्णयाचा लाभ होईल. केंद्रीय अर्थसंकल्पातून औषधावरील सीमा शुल्क पूर्णतः रद्द केल्यामुळे त्याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांचे आभार, केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी माणून केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे

## विविध वृत्त...


### शेतकरी दलित आणि आदिवासी यांच्या तोंडाला पाणी पुसणार हे अर्थसंकल्प आहे - प्रकाश आंबेडकर



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशाचे बजेट सादर केल आहे. बजेट संदर्भात वंचितचे नेते प्रकाश आंबेडकरांची प्रतिक्रिया समोर आली आहे. शेतकऱ्यांसाठी निराशाजनक बजेट असल्याचं आंबेडकरांनी म्हटल आहे.शेतकरी दलित आणि आदिवासी यांच्या तोंडाला पाणी पुसणार हे अर्थसंकल्प असल्याचंही ते म्हटल आहे. तसेच पुढील तीन ते चार महिन्यात भारताची अर्थव्यवस्था कोसळेल, असे संकेतही त्यांनी दिले आहे.

### गावातील रुग्णांच्यासाठी सहानुभूतीसाठी १० नागरिकांनी केले टक्कल



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील बोंडगाव या गावात केस गळतीचे एकूण ३० रुग्ण असून त्यांच्यावर आरोग्य विभागाचे विविध शाखांकडून औषधोपचार सुरू आहेत. दरम्यान मनोबल कमी झालेल्या या रुग्णालयाचे मनोबल उंचावण्यासाठी येथील गावकऱ्यांनी स्वतःचे मुंडन करून रुग्णांचे मनोबल वाढवण्यासाठी आता पुढाकार घेतला आहे.

बोंडगाव या गावातील युवकांनी आपल्या गावात रुग्ण असलेल्या नागरिकांचे मुंडण झाले म्हणून स्वतःचे ही मुंडन करून घेतले आहे. शेगाव तालुक्यातील बारा गावांमध्ये मागील महिन्याभरापासून केस गळतीच्या घटना उघडकीस आलेले आहेत. आरोग्य प्रशासनाकडून ठोस निदान झाले नसल्याने उच्चस्तरीय आरोग्य प्रशासनाचे चमु बोलावून या प्रकाराची कसून चौकशी केल्या जात आहे मात्र अद्याप पर्यंत आरोग्य प्रशासनाला यामध्ये यश आलेले नाही. दुसरीकडे केस गळती प्रकरणातील आयसीएमआरचे रिपोर्ट अद्याप येणे बाकी आहे त्याची आतुरता गावकऱ्यांचा आरोग्य प्रशासनाला लागून आहे.

### बुलढाण्यात सहकार दिंडीचे आगमन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आतंरराष्ट्रीय सहकार दिनाचे आयोजन ९ फेब्रुवारी ला शिर्डी या ठिकाणी आयोजित करण्यात आले. त्या निमित्त जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे सहकार दिंडीचे आगमन बुलढाण्यात आज झाले आहे. बुलढाणा अर्बन चे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक, आमदार संजय गायकवाड यांचे प्रमुख उपस्थितीत जिल्ह्यातील सर्वच प्रमुख पतसंस्था अध्यक्ष पदाधिकारी कर्मचारी या दिंडी मध्ये सहभागी झाले आहे. या दिंडीमुळे बुलढाणा आज सहकारमय झाले होते.

### कात्रज भागात अमली पदार्थ विक्री करणारा गजाआड, एक लाखांचे चरस जप्त

**पुणे/प्रतिनिधी :** अमली पदार्थ विक्री प्रकरणात गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने एका तरुणाला अटक केली. कात्रज भागातील मांगडेवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून चरस, मोबाइल संच, रोकड असा एक लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शिवलिंग नागनाथ आवटे (वय ३९, रा. शंभू रेसीडन्सी, मांगडेवाडी, कात्रज) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्याकडून ९८ ग्रॅम चरस, दोन मोबाइल संच, रोकड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अमली पदार्थ विक्रेत्यांविरुद्ध कारवाईचे आदेश दिले आहेत. आवटे पुणे-सातारा रस्त्यावरील मांगडेवाडीत अमली पदार्थ विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे चरस सापडले. आवटेने चरस कोठून आणले, तसेच कोणाला विक्री करणार होता ? यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेस इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे आदी पोलिसांनी ही कारवाई केली.

## संत-महंतांनी गुंडगिरीचे समर्थन करणे योग्य नाही, मुंडेंची पाठराखण करणारे नामदेव शास्त्री टीकेचे धनी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** गुन्हेगारांचे समर्थन करणे हे संत महात्म्यांना शोभत नाही, असं मत ह.भ.प. भागचंद्र झांजे महाराज यांनी व्यक्त केले आहे. महंत नामदेव शास्त्री यांनी गुन्हेगारांच्या पार्श्वभूमीकडे पाहिले पाहिजे, या वक्तव्यावर झांजे महाराज यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली ते बीडमध्ये बोलत होते. हा देश संविधानावर चालतो, कायद्याने जे योग्य असेल तेच होईल. वारकरी संप्रदायातील संत-महंतांनी गुंडगिरीचे समर्थन करणे योग्य नाही. महंत नामदेव शास्त्री यांच्या वक्तव्यावर आता विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत.

महंत नामदेव शास्त्री ज्या आरोपींचे समर्थन करत आहेत, त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत. गुंडगिरीचे समर्थन करणे आणि राजकीय पुढाऱ्यांची पाठराखण करणे हे संतांच्या भूमिकेशी सुसंगत नाही. वारकरी संप्रदाय समाजाला दिशा देणारा आहे अशा संप्रदायाशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवला पाहिजे. जर संत-महंत गुंडांचे समर्थन करत असतील, तर ग्राम स्थांचा, वारकऱ्यांचा आणि संप्रदायाचा विश्वास उडेल, असेही झांजे महाराज यांनी सांगितले.

काय म्हणाले नामदेव शास्त्री?

भगवानगड धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कम पुणे उभा असून तो मुलगा राजकीय घराण्यामध्ये जन्माला आलेले आहे. राजकीय पक्षाचे सर्व नेते त्याचे बालमित्र आहेत त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसतानाही त्याला गुन्हेगार ठरवले जातंय असे मला वाटते. गोपीनाथरावांचा तो पुतण्या आहे त्याची पार्श्वभूमी गुन्हेगारी नाही. त्याची पार्श्वभूमी गुन्हेगाराची नाही तिला जाणीवपूर्वक गुन्हेगार केले जाते असे मला वाटतेय. यामुळे आमच्या सांप्रदायिक मोठे नुकसान झाले आहे. गे जातीयवाद संपत आलेला असताना काही नेत्यांनी जाणीवपूर्वक जातीयवाद उफाळून आणलाय. संतांच्या कार्यावर कुठेतरी पाणी फिरले जात असल्याचं मला वाटत आहे. जातीय सलोखा नष्ट होत असल्याचे जाणवतय. भगवानगड धनंजय मुंडे यांच्या भक्कमपणे पाठीशी उभा आहे. जे गुन्हेगार आहेत त्यांचा शोध चालू आहे, त्यांच्यावर कारवाई होईलच मात्र ज्या गुन्हेगारांनी ही घटना घडवली त्यांच्या मानसिकतेचा अभ्यास मीडियाने का नाही केला असा सवालही नामदेव शास्त्री यांनी उपस्थित केला आहे.

## राहेरी येथील लाँग मार्च स्तंभाच्या कामाला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** सविस्तर वृत्त असे की राहेरी येथील.संघर्ष भूमी. या ठिकाणी एक मोठा इतिहास असून नामांतरासाठी प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सर यांच्या नेतृत्वामध्ये नागपूर ते मुंबई आसा. लाखो कार्यकर्त्यांसह लॉन्ग मार्च काढण्यात आला होता हा लाँग मार्च भव्य अशा प्रमाणात असल्यामुळे सरकारला सुद्धा इतरत्र ठिकाणी तो थांबवणे शक्य झाले नाही म्हणून राहेरीचा. वनवे असा असलेला भव्य असा पूर्णा नदीवरील पूल या ठिकाणी हा मोर्चा थांबवण्याचे सरकारकडून नियोजन करण्यात आले मात्र प्राध्यापक .जोगेंद्र कवाडे सर यांच्या सोबत असलेले भीमसैनिक हे मोठ्या जोशात आणि तितक्याच रागात हा मोर्चा घेऊन निघाले होते या ठिकाणी पोलिस आणि भीमसैनिकांमध्ये मोठ्या प्रमाणात झडप सुद्धा झाली काही भीमसैनिक या ठिकाणी शहीद झाले तीच पार्श्र्वभूमी..राहेरीला असून ३५ ते ४० वर्षापासून या संघर्ष भूमीवर हजारो लाखो भीमसैनिक शहिदांना अभिवादन करण्यासाठी येत असतात बरेच वर्ष झाली येथे सरांच्या माध्यमातून कामाला सुरुवात होत होती मात्र काही कारणास्तव काम पूर्ण होत नव्हतं आज मात्र पूर्णपणे या कामाला सुरुवात झाली असून या संघर्ष भूमीवर भव्य असा ५० फुटाचा स्तंभ शहिदांची आठवण म्हणून उभा राहत आहे. अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर सिंदखेडराजा लोणार चिखली, देऊळगाव राजा येथील भीमसैनिकांचा स्वप्न पूर्ण होत आहे त्याच माध्यमातून आज प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सर यांनी चालू झालेल्या कामाची पाहणी केली.

यावेळेस या कामावर नियुक्ती केलेली समिती भाई गौतम कासारे यांच्या माध्यमातून या कामावरती देखरेख ठेवण्याचे काम संपूर्ण जबाबदारी ही भाई गौतम कासारे यांच्याकडे देण्यात आली असून यावेळेस चरणदास इंगोले सर. भाई भिकाजी इंगळे. भाई कैलास नरवाडे भाई मधुकरराव शिंदे. सुनील भाऊ इंगळे. अमोल गवई. बळी भाऊ मोरे. विनोद इंगळे. संतोष हिवाळे. विकास कासारे. आर्किटेक शरद खरात. इंजिनीयर शिवकुमार जायभाये अशी अनेक कार्यकर्ते प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सरांसोबत होते.

## फखरोद्दीन अली अहमद उर्दू हायस्कुल मध्ये असलम खान याचा सत्कार




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** २५ जानेवारी २०२५ रोज शुक्रवार व शनिवार या दोन दिवसीय कार्यक्रम आयोजीत केला होता आनंद मेळावा व विज्ञान प्रदर्शन बक्षीश वितरण असे दोन दिवस कार्यक्रम घेण्यात आले असून या कार्यक्रमाचे उदघाटन संस्था अध्यक्ष मा. राजेंद्र हनवंतराव आखाड़े, संस्थाउपाध्यक्ष शेख नाजिम भाई कुरैशी, सचिव शेख निसार भाई ,शिव चरण आखाड़े ,शेख शब्बीर भाई, शेख नसीम भाई कुरैशी ,किशोर भाऊ आखाड़े, शेख राफीउल्लाह भाई,शेख उमर भाई ,सर्वसदस्यगण सर्वानी आनंद मेळाव्यचे आनंद घेऊन विध्यर्थनी आनलेले सर्व पदार्थाची चव घेऊन स्तुती केली या सर्वांचे हस्ते २५/०१/२०२५ ला विज्ञान प्रदर्शनचे उदघाटन सुद्धा या मंडळीच्या हस्ते होऊन बक्षीश वितरण सुद्धा करण्यात आले.

या दोन्ही कार्यक्रमाचे अवचित साधून ज्यांन्री शाळेसाठी उल्लेखनीय कामगीरी केली ज्याणी शाळेचे नाव उंच केले असे असलम खान (ङ-) यानी विज्ञान प्रदर्शन मध्ये तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकिवले व ते जिल्हा स्तरावर पात्र झाले होते सैफुल इस्लाम सर यानी सुद्धा विज्ञान प्रदर्शनमध्ये तीसरा क्रमांक मिळविला तर सरवर सर सुद्धा सहभागी होते ,शफीक सर यानी स्काउट गाइड मध्ये सहभाग नोंदविला होता

तसेच इस्लाम सर यानी सुद्धा हिंदी मध्ये प्रमाणपत्र मिळविले तसेच संस्था तर्फे वर्ग १२वी १०वी मधून प्रथम दृतिव व तृतीव गुण प्राप्त करणाऱ्या विध्यर्थना शील्ड प्रमाणपत्र देऊन त्यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला मंचकावर उपस्थित संस्थाचे वतीने संस्था अध्यक्ष मा. राजेंद्र हनवंतराव अखाड़े ,संथाचे उपाध्यक्ष शेख नाजिम भाई कुरैशी,सचिव शेख निसार भाई,सर्व संथाचे पदाधिकारी शाळेचे प्राचार्य मा.मो. सोहेल सर या सर्वानी असलम खान यांना शील्ड व प्रमाणपत्र देऊन त्यांचा जोरदार सत्कार करण्यात आला गुण गौरव सुद्धा करण्यात आला या मुळे शाळेमध्ये व शाळेच्या परिसर मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले या कार्यक्रमाला सर्व शिक्षक कर्मचारी अवर्जून उपस्तिथ होते या कार्यक्रमाचे सूत्र संचालन शोएब सर यानी केले तर आभार प्रदर्शन आरिफ सर यांनी केले.

## सगळे शेतकरी अर्थसंकल्पावर निराश - रविकांत तुपकर

दैनिक आपला विदर्भ




**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय अर्थसंकल्प आज जाहीर झाला प्रचंड अपेक्षा शेतकऱ्यांना या अर्थसंकल्पावरून होत्या. परंतु शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आलेली आहे तोच काही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अर्थसंकल्पामध्ये झालेलं नाहीये आम्हालाही अर्थसंकल्पातून अस अपेक्षित होतं की प्रत्यक्ष उत्पादन खर्च जो शेतकऱ्यांचा होतो त्याला ५०% नफ्याने ऍड करून भावाच्या अनुषंगाने अपेक्षित होतं. हमी भावाप्रमाणे जर एखाद्या व्यापाऱ्यांनी माल खरेदी केला नाही तर त्या हमीभावाचा कठोर कायदा करणे अपेक्षित होत शिक्षेचा तो सुद्धा याच्यामध्ये केला गेलेला नाहीये. प्रत्येक गाव तिथे गोडाऊन शेतमाल साठवण्यासाठी शेतकऱ्यांना. शेतापर्यंत सिंचनाची सुविधा.. सिंचनासाठी पाच वर्षाचा एक प्रोजेक्ट सरकारने अपेक्षित होतं सुद्धा नाही.. जीएम सोयाबीन लावायला आपल्या देशात लावायला परवानगी मिळाली पाहिजे.. तसं जीएम सोयाबीन अमेरिका ब्राझीलमध्ये ४४ क्विंटल पर्यंत उत्पादन शेतकरी घेतात.. आणि त्या जीएम सोयाबीनचे तेल आपल्या देशात आपल्याला खाऊ घालतात पण जीएम सोयाबीन लावायला परवानगी आपल्याला देत नाही.तंत्रज्ञानाच्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये काही तरतूद केल्या गेलीय नाहीत. शेतकरी कर्जमुक्त होणे अपेक्षित होत या अर्थसंकल्पामध्ये पण तसही काही त्या ठिकाणी केलेल नाहीये.आणि कापसाच्या विविध जाती विकसित केलं असं ते म्हणाले परंतु कापसाच्या भावाचं काय. सोयाबीनच्या भावाचं काय,या दृष्टीने काही नाही. सरकार म्हणते खरेदी आम्ही करणार कडधान्य आणि तेल बिया.. परंतु फक्त या घोषणा आहेत. १००% माल सरकार खरेदी करत नाही. त्याच्यामध्ये जाचक अटी घालणार मोईश्र्चरची अट घालणार एवढाच मला मी खरेदी करणार. आणि व्यापारी शेतकऱ्यांचा माल घेऊन खरेदी केंद्रावर जाणार अशा पद्धतीने हे उद्योग होतात. त्यामुळे या गोष्टीला काही अर्थ नाही.१०० जिल्हे त्या ठिकाणी कमी उत्पादना वाले कृषी विकास योजनेच्या अंतर्गत त्यांनी निवडले. देशामध्ये जिल्हे आहेत ८०० आणि तुम्ही १०० जिल्ह्यांवर फोकस करणार,मग बाकीचे शेतकऱ्यांनी काय करायचं. हा अर्थसंकल्प फक्त शेतकऱ्यांचे नाव कुठे ते जोडायला लागतं म्हणून या दोन तीन घोषणा त्यांनी केल्या. पण यातून शेतकऱ्यांच्या हातात काही लागणार नाही. घोषणा मोठमोठ्या आहेत असं हेडलाईन मॅनेजमेंट त्याठिकाणी केल्या गेलेल आहे. परंतु शेतकऱ्यांच्या जीवनमानात फार काही सुधारणा होईल या आजच्या अर्थसंकल्पामुळे असं मला वाटत नाही. खरंच जर यांना शेतकऱ्यांच्या दृष्टीने काही करायचं होतं गाव तिथे प्रत्येक शेतामध्ये सिंचन. शेतमाल साठवणुकीचे केंद्र.. प्रत्यक्ष उत्पादन खर्चाच्या नफ्या प्रमाणे भाव. आयात निर्यातीच्या खाजगी बाजारामध्ये भाव स्थिर करणे. या गोष्टी करणं अपेक्षित होतं परंतु ते यामध्ये कुठेही दिसून येत नाही यामुळे आम्ही सगळे शेतकरी आजच्या अर्थसंकल्पावर निराश आहोत.